RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ५, अंक ३०] बुधवार, फेब्रुवारी २७, २०१९/फाल्गुन ८, शके १९४० [पृष्ठे १५, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ६७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय
मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ फेब्रुवारी २०१९

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.**

क्रमांक परिनि. २०१८/प्र.क्र.१२५/विशि-२.— महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) याच्या कलम ५६ च्या पोट-कलम (२) चा खंड (ख) आणि कलम ७१ चे पोट-कलम (११) तसेच कलम ७२ चे पोट-कलम (१०) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाच्या कामकाजाच्या कार्यकारी यंत्रणेशी संबंधित एकरूप परिनियम विहित करीत आहे :—

**सन २०१९ चा एकरूप परिनियम क्रमांक ५**

१. **संक्षिप्त नाव**.—या परिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाच्या कामकाजाची कार्यकारी यंत्रणा) एकरूप परिनियम, २०१९, असे म्हणावे.

२. **व्याख्या**.—या परिनियमांत संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(एक) "व्यथित विद्यार्थी" याचा अर्थ, या परिनियमान्वये व्याख्या केलेल्या तक्रारीशी संबंधित बाबीमध्ये, ज्या विद्यार्थ्याची कोणतीही फिर्याद असेल तो विद्यार्थी, असा आहे आणि त्यामध्ये उच्च शिक्षण देणाऱ्या कोणत्याही विद्यापीठात किंवा महाविद्यालयात किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेत प्रवेश मागणाऱ्या व्यक्तीचा समावेश होतो ;

(दोन) "प्रवेशाचे घोषित धोरण" याचा अर्थ, विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्याकडून प्रस्तुत करण्यात आले असेल आणि माहितीपुस्तिकेत प्रसिद्ध करण्यात आले असेल त्याप्रमाणे पाठ्यक्रमाच्या किंवा अध्ययनक्रमाच्या प्रवेशाबाबतचे धोरण, असा आहे ;

(तीन) "तक्रारी" यामध्ये, व्यथित झालेल्या विद्यार्थ्यांच्या पुढील फिर्यादींचा समावेश होतो :—

(क) राज्याच्या व विद्यापीठाच्या प्रवेशाच्या घोषित धोरणानुसार निर्धारित केलेल्या गुणवत्तेच्या निकषाविरुद्ध जाऊन प्रवेश देणे ;

(ख) विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्याकडून प्रवेश प्रक्रियेत अनियमितता होणे ;

(ग) माहितीपुस्तिकेत प्रसिद्ध केल्याप्रमाणे प्रवेशाच्या घोषित धोरणानुसार प्रवेश देण्याचे नाकारणे ;

(घ) या परिनियमाच्या खंड ३ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, एकतर छापील प्रतीच्या स्वरूपात किंवा ऑनलाईन स्वरूपात माहितीपुस्तिका प्रसिद्ध न करणे ;

(ङ) जी माहिती खोटी व दिशाभूल करणारी आहे आणि वस्तुस्थितीवर आधारित नाही अशी कोणतीही माहिती माहितीपुस्तिकेमध्ये प्रसिद्ध करणे ;

(च) एखादी व्यक्ती, जिचे शिक्षण पुढे सुरू ठेवण्यास इच्छुक नसेल अशा व्यक्तीला कोणत्याही पाठ्यक्रमाच्या किंवा अध्ययनक्रमाच्या बाबतीतील कोणतेही शुल्क भरण्याकरिता प्रेरित करण्याच्या किंवा तिच्यावर सक्ती करण्याच्या हेतूने, अशा एखाद्या विद्यापीठात किंवा महाविद्यालयात किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेत त्या व्यक्तीने प्रवेश घेताना ते विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्याकडे तिने जमा केलेल्या पदवी, पदविका प्रमाणपत्राच्या किंवा कोणत्याही अन्य पारितोषिकांच्या किंवा इतर कागदपत्राच्या स्वरूपातील कोणताही दस्तऐवज रोखून ठेवणे किंवा तो परत करण्यास नकार देणे ;

(छ) अशा विद्यापीठाकडून किंवा महाविद्यालयाकडून किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेकडून आकारण्यात येणाऱ्या, प्रवेशाच्या घोषित धोरणामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किंवा सक्षम प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या रकमेपेक्षा अधिक रकमेची मागणी करणे ;

(ज) प्रवेशातील आरक्षणाबाबत लागू असलेल्या धोरणाचा भंग करणे ;

(झ) प्रवेशाच्या वेळी गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, यांसारखी मूळ शैक्षणिक व वैयक्तिक प्रमाणपत्रे आणि प्रशस्तिपत्रे, तसेच अशी इतर कागदपत्रे, ती मूळ स्वरूपात सादर करणे अनिवार्य नसतानाही सादर करण्याचा विद्यार्थ्यांना आग्रह करणे ;

(ञ) लिंग, वंश, जात, वर्ग, पंथ, जन्मस्थान, धर्म व दिव्यांगता या कारणांवरून विद्यार्थ्यांच्या कथित भेदभावाच्या तक्रारी ;

(ट) संबंधित प्राधिकरणाकडून शिष्यवृत्तीची रक्कम प्राप्त झाल्यानंतर ती, विद्यापीठाकडून किंवा महाविद्यालयाकडून किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेकडून एखाद्या विद्यार्थ्यास प्रदान केली न जाणे, किंवा प्रदान करण्यात विलंब करणे ;

(ठ) प्रवेश रद्द झाल्यास शुल्काच्या परताव्याबाबतच्या नियमांचे पालन न करणे ;

(ड) शैक्षणिक वेळापत्रकामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीची मर्यादा पार करून परीक्षा घेण्यात किंवा त्यांचे निकाल जाहीर करण्यात अवाजवी विलंब करणे ;

(ढ) विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्याकडून माहितीपुस्तिकेत आश्वासन देण्यात आले असेल किंवा पुरविणे आवश्यक असेल त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना सुविधा न पुरविणे ;

(ण) मूल्यमापन पद्धती पारदर्शक नसणे किंवा अनुचित असणे ;

(चार) "विभाग तक्रार निवारण कक्ष" याचा अर्थ, खंड ५ च्या उपखंड (१) मध्ये विहित केल्याप्रमाणे, विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ परिसंस्थास्तरावरील, या परिनियमान्वये घटित केलेली समिती, असा आहे ;

(पाच) "संस्थात्मक तक्रार निवारण कक्ष" याचा अर्थ, खंड ५ च्या उपखंड (२) मध्ये विहित केल्याप्रमाणे विद्यापीठस्तरावरील या परिनियमान्वये घटित केलेली समिती, असा आहे ;

(सहा) "महाविद्यालय तक्रार निवारण कक्ष" याचा अर्थ, खंड ५ च्या उपखंड (३) मध्ये विहित केल्याप्रमाणे महाविद्यालय किंवा यथास्थिति मान्यताप्राप्त परिसंस्थास्तरावर या परिनियमान्वये घटित केलेली समिती, असा आहे.

(सात) "विद्यापीठ तक्रार निवारण कक्ष" याचा अर्थ, खंड ५ च्या उपखंड (४) मध्ये विहित केल्याप्रमाणे विद्यापीठस्तरावर या परिनियमान्वये घटित केलेली समिती, असा आहे.

(आठ) "लाभाचे पद" याचा अर्थ, लाभ किंवा आर्थिक लाभ मिळविण्याची क्षमता असलेले आणि ज्यास काही पगार, वेतन, वित्तलब्धी, पारिश्रमिक किंवा पूरक भत्ता याव्यतिरिक्त इतर भत्ता संलग्न आहे असे पद, असा आहे ;

(नऊ) "लोकपाल" याचा अर्थ, या परिनियमान्वये नियुक्त केलेला लोकपाल, असा आहे;

(२) या परिनियमात वापरण्यात आलेले, परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) यात अनुक्रमे जे अर्थ नेमून देण्यात आलेले असतील, तेच अर्थ असतील.

३. **माहितीपुस्तिका, अनुक्रमणिकेसह व किंमतीसह प्रसिद्ध करणे अनिवार्य असणे :—**

(१) प्रत्येक विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था, तिच्या कोणत्याही पाठ्यक्रमांसाठीची किंवा अध्ययनक्रमांसाठीची प्रवेश प्रक्रिया सुरू होण्याच्या दिनांकापूर्वी किमान साठ दिवस संपण्या अगोदर, अशा विद्यापीठात किंवा महाविद्यालयात किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींच्या व सर्वसाधारण जनतेच्या माहितीसाठी पुढील माहिती अंतर्भूत असणारी माहितीपुस्तिका प्रसिद्ध करील आणि/किंवा तिच्या संकेतस्थळावर टाकील :—

(एक) अध्यापनाचे तास प्रात्यक्षिक सत्रे व इतर नेमून दिलेली कामे यांच्या सहीत प्रत्येक पाठ्यक्रम किंवा अध्ययनक्रम यासाठी समुचित प्राधिकरणाने किंवा यथास्थिति, विद्यापीठाने विनिर्दिष्ट केलेल्या अभ्यासक्रमाच्या ढोबळमानाने प्रस्तावित केलेल्या अध्ययनक्रमांची व पाठ्यक्रमांची सूची ; तसेच अध्ययन तासिका, प्रात्यक्षिक सत्रे आणि इतर प्रकल्प यांबाबतची माहिती ;

(दोन) अशा विद्यापीठात, किंवा महाविद्यालयात किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेत पाठ्यक्रमाचे किंवा अध्ययनक्रमाचे शिक्षण घेण्याकरिता प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांकडून देय असलेले शुल्क, ठेवी व इतर आकार असे प्रत्येक घटक आणि अशा प्रदानाच्या अटी व शर्ती ;

(तीन) ज्या शैक्षणिक वर्षाच्या पाठ्यक्रमासाठी किंवा अध्ययनक्रमासाठी प्रवेश देण्याचे प्रस्तावित केले आहे त्याबाबतीत, समुचित सांविधिक प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या जागांची संख्या ;

(चार) विद्यापीठाने किंवा महाविद्यालयाने किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेने विनिर्दिष्ट केलेल्या, विशिष्ट पाठ्यक्रमासाठी किंवा अध्ययनक्रमासाठी विद्यार्थी म्हणून प्रवेश घेणाऱ्या व्यक्तीची किमान व कमाल वयोमर्यादा यांसहीत, शैक्षणिक अर्हतेच्या व पात्रतेच्या शर्ती ;

(पाच) प्रत्येक पाठ्यक्रमासाठी किंवा अध्ययनक्रमासाठीच्या प्रवेशकरिता अशा उमेदवारांची निवड करण्यासाठीच्या चाचणी किंवा परीक्षा, यांच्या तपशिलाच्या बाबतीतील सर्व संबंधित माहितीसह अशा प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या पात्र उमेदवारांची निवड प्रक्रिया आणि प्रवेश चाचणीकरिता विहित केलेल्या शुल्काची रक्कम ;

(सहा) कोणताही द्रव्यदंड, विनिर्दिष्ट केलेली शीर्षे किंवा प्रवर्ग, लादता येतील असे किमान व कमाल द्रव्यदंड लादण्यासाठीचे व ते वसूल करण्यासाठीचे नियम/विनियम ;

(सात) अशा विद्यापीठात किंवा महाविद्यालयात किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेत प्रवेश दिलेला विद्यार्थी पाठ्यक्रम किंवा अध्ययनक्रम पूर्ण करण्यापूर्वी किंवा पूर्ण केल्यावर, अशा विद्यापीठातून किंवा महाविद्यालयातून किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेतून बाहेर पडला असेल त्याबाबतीत, विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था, यांच्याकडून परतावायोग्य असलेल्या शिक्षण शुल्काचे व इतर आकाराचे प्रमाण, आणि ज्यावेळेत व ज्यारीतीने त्या विद्यार्थ्यांना असा परतावा देण्यात येईल ती वेळ व ती रीत ;

(आठ) प्रवेशाच्या वेळी सादर करावयाची कागदपत्रे ;

(नऊ) प्रत्येक विद्याशाखेच्या अध्यापकाची शैक्षणिक अर्हता व अध्यापन अनुभव समाविष्ट असलेला तसेच असे अध्यापक नियमित तत्त्वावर किंवा अभ्यागत म्हणून कार्यरत आहे हे दर्शविणारा, अध्यापकवर्गाचा तपशील ;

(दहा) वसतिगृह निवासव्यवस्था, ग्रंथालय व रुग्णालय यांसहीत भौतिक व शैक्षणिक पायाभूत सुविधा व इतर सुविधा किंवा विद्यार्थ्यांना ज्या उद्योगामध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षण द्यावयाचे आहे तो उद्योग आणि विशेषतः त्या विद्यापीठात किंवा महाविद्यालयात किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेत प्रवेश देण्यात आल्यावर विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या सुविधा यांबाबतची माहिती ;

(अकरा) विद्यापीठाच्या किंवा महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या परिसरात किंवा त्या बाहेर विद्यार्थ्यांनी शिस्त राखण्याशी संबंधित सर्व अनुदेश ;

(बारा) अनुदानित व विनाअनुदानित पाठ्यक्रमांचे स्पष्ट सीमांकन ;

(तेरा) विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांना योग्य वाटेल अशी कोणतीही माहिती.

(२) विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था वरील खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेली माहिती आपल्या अधिकृत संकेतस्थळावर टाकून आणि वृत्तपत्रांमध्ये व इतर माध्यमांमध्ये व्यापक प्रसिद्धी देऊन संभाव्य विद्यार्थ्यांना आणि सामान्य जनतेला कळवील.

(३) प्रत्येक विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रवेश अर्जाच्या नमुन्यासह अशा माहितीपुस्तिकेच्या प्रत्येक मुद्रित प्रतीची, प्रकाशनाच्या व वितरणाच्या वाजवी खर्चापेक्षा अधिक नसेल एवढी, किंमत निश्चित करील आणि तिच्या प्रकाशनापासून, वितरणापासून किंवा विक्रीपासून कोणताही नफा मिळवणार नाही.

४. **तक्रार स्वीकारण्याबाबत अपवाद.—**राज्य शासनाच्या अंतर्गत असलेल्या कोणत्याही सांविधिक यंत्रणेद्वारे नियमन होणाऱ्या, ज्या विषयवस्तुशी जिच्यासाठी राज्याच्या संबंधित अधिनियमाअन्वये तक्रार निवारण यंत्रणेची विशेषरित्या तरतूद करण्यात आली आहे त्या विषय वस्तूशी संबंधित तक्रारी, तक्रार निवारण कक्ष किंवा लोकपाल यांच्याकडून स्वीकाराल्या जाणार नाहीत.

५. **तक्रार निवारण कक्ष :**

(१) **विभाग तक्रार निवारण कक्ष (वि.त.नि. कक्ष) :—**

(एक) विद्यापीठाच्या बाबतीत, विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ परिसंस्था यांच्याशी संबंधित सर्व तक्रारी, सर्वप्रथम, विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ परिसंस्था स्तरावर घटित करण्यात आलेल्या विभाग तक्रार निवारण कक्षाला उद्देशून करण्यात येतील. या समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल :—

(क) विद्यापीठ विभागाचा किंवा विद्यापीठ परिसंस्थेचा प्रमुख———अध्यक्ष ;

(ख) कुलगुरूने नामनिर्देशित करावयाचा, विद्यापीठ विभागाच्या किंवा विद्यापीठ परिसंस्थेच्या बाहेरील प्राध्यापक——सदस्य ;

(ग) विद्यापीठ विभागाच्या किंवा विद्यापीठ परिसंस्थेच्या प्रमुखाने नामनिर्देशित करावयाचा, तक्रार निवारण यंत्रणेमध्ये तरबेज असणारा अध्यापक———सदस्य-सचिव

(दोन) कक्षाचा अध्यक्ष व सदस्य यांचा पदावधी दोन वर्षे इतका असेल.

(तीन) बैठकीसाठीची गणपूर्ती, अध्यक्षासह दोन इतकी असेल.

(चार) विभाग तक्रार निवारण कक्ष, विद्यार्थ्यांच्या तक्रारींवर निर्णय देताना, नैसर्गिक न्यायाच्या तत्वांचे पालन करील.

(पाच) विभाग तक्रार निवारण कक्ष, तक्रार मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत, तक्रारींचे निवारण करील. वि.त.नि.कक्ष अशा तक्ररींचे प्रमाण कमी करण्याच्या व त्यांना आळा घालणाऱ्या उद्देशाने विद्यापीठाला नियतकालांतराने विविध उपाययोजना सूचवील.

(सहा) वि.त.नि.कक्ष, व्यथित व्यक्तीला (व्यक्तींना) आदेशाची प्रत पुरवील.

(२) **संस्थात्मक तक्रार निवारण कक्ष (सं.त.नि. कक्ष) :—**

(एक) विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ परिसंस्था यांच्याशी संबंधित नसतील अशा तक्रारी आणि विभाग तक्रार निवारण कक्षामध्ये निवारण न झालेली गाऱ्हाणी ही, विद्यापीठाच्या कुलगुरूने घटित करावयाच्या संस्थात्मक तक्रार निवारण कक्षाकडे निर्देशित करण्यात येतील. या कक्षाची रचना पुढीलप्रमाणे असेल :—

(क) प्र-कुलगुरू/अधिष्ठाता/वरिष्ठ प्राध्यापक ——— अध्यक्ष ;

(ख) अध्यक्षाखेरीज दोन वरिष्ठ प्राध्यापक———सदस्य

(ग) नोंदणीकृत पदवीधर मतदारसंघातून एक अधिसभेचा सदस्य———सदस्य

(घ) संचालक, विद्यार्थी विकास ———सदस्य सचिव

(दोन) संस्थात्मक तक्रार निवारण कक्षाचा आणि विभाग तक्रार निवारण कक्षाचा अध्यक्ष एकच असणार नाही. कक्षाच्या सदस्यांचा पदावधी दोन वर्षे इतका असेल.

(तीन) बैठकीची गणपूर्ती, अध्यक्षासह तीन जण इतकी असेल.

(चार) संस्थात्मक तक्रार निवारण कक्ष, निर्णय घेताना, विभाग तक्रार निवारण कक्षची शिफारस विचारात घेईल. तथापि, सं.त.नि. कक्षाला, वि.त.नि. कक्षाच्या तक्रारींचे परीक्षण करण्याचा अधिकार असेल.

(पाच) सं.त.नि.कक्ष, तक्रारींवर निर्णय देताना, नैसर्गिक न्यायाच्या तत्वांचे पालन करील.

(सहा) सं.तं.नि. कक्ष, तक्रार प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत, तक्रारीचे निवारण करील. सं.त.नि. कक्ष, अशा तक्रारींचे प्रमाण कमी होण्याच्या व त्यांना आळा घालण्याच्या उद्देशाने, विद्यापीठाला, नियत कालांतराने विविध उपाय सुचवील.

(सात) संस्थात्मक तक्रार निवारण कक्ष व्यथित व्यक्तीला (व्यक्तींना) आदेशाची एक प्रत पुरवील.

**(३) महाविद्यालय तक्रार निवारण कक्ष (म.त.नि.कक्ष) :—**

(एक) महाविद्यालयांच्या/मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या बाबतीत सर्व तक्रारी या, सर्वप्रथम महाविद्यालय तक्रार निवारण कक्षाला उद्देशून करण्यात येतील. या समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल :—

(क) महाविद्यालयाचा प्राचार्य किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेचा प्रमुख————अध्यक्ष ;

(ख) महाविद्यालयाच्या प्राचार्याने किंवा मान्यता प्राप्त परिसंस्थेच्या प्रमुखाने नामनिर्देशित करावयाचे दोन वरिष्ठ अध्यापक——— ——— सदस्य.

(दोन) सदस्यांचा पदावधी दोन वर्षे इतका असेल ;

(तीन) बैठकीसाठीची गणपूर्ती ही, अध्यक्षासह दोन जण इतकी असेल ;

(चार) महाविद्यालय तक्रार निवारण कक्ष, विद्यार्थ्यांच्या गाऱ्हाण्यांवर विचार करताना, नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन करील ;

(पाच) महाविद्यालय तक्रार निवारण कक्ष, तक्रार मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत तक्रारीचे निवारण करील. महाविद्यालय तक्रार निवारण कक्ष, अशा तक्रारींचे प्रमाण कमी करण्याच्या व त्यांना आळा घालण्याच्या उद्देशाने व्यवस्थापनाला आणि यथास्थिति विद्यापीठाला नियतकालांतराने विविध उपाययोजना सुचवील ;

(सहा) महाविद्यालय तक्रार निवारण कक्ष, व्यथित व्यक्तीला (व्यक्तींना) आदेशाची एक प्रत पुरवील.

**(४) विद्यापीठ तक्रार निवारण कक्ष (वि.त.नि.कक्ष) :—**

(एक) विद्यापीठाविरूद्धच्या तक्रारीच्या आणि महाविद्यालय तक्रार निवारण कक्षाकडून निर्णय न देण्यात आलेल्या तक्रारींच्या बाबतीत, त्या तक्रारी, विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाकडे निर्देशित करण्यात येतील. या प्रयोजनाकरिता संलग्न विद्यापीठाचा कुलगुरू, एका महाविद्यालयासाठी/मान्यताप्राप्त परिसंस्थेसाठी, किंवा महाविद्यालयाचे (महाविद्यालयांचे)/मान्यताप्राप्त परिसंस्थेचे (परिसंस्थांचे) ठिकाण लक्षात घेऊन, महाविद्यालयांच्या/ मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या गटासाठी, सहा सदस्यांनी मिळून बनलेली, विद्यापीठ तक्रार निवारण कक्ष घटित करील. संलग्न विद्यापीठाचा कुलगुरू, विद्यापीठ तक्रार निवारण कक्ष घटित करील व ती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

(क) प्र-कुलगुरू/अधिष्ठाता/वरिष्ठ प्राध्यापक ---------- अध्यक्ष ;

(ख) अधिसभेच्या सदस्यांमधून तीन प्राचार्य, त्यांपैकी एक महिला असेल आणि एक अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/निरधिसूचित जमाती/भटक्या जमाती/इतर मागास वर्ग या प्रवर्गातील असेल ;

(ग) नोंदणीकृत पदवीधर मतदारसंघातून, अधिसभेचा एक सदस्य ; सदस्य

(घ) संचालक, विद्यार्थी विकास ——————सदस्य सचिव.

(दोन) समितीचा अध्यक्ष आणि सदस्य यांचा पदावधी दोन वर्षे इतका असेल.

(तीन) बैठकीची गणपूर्ती, अध्यक्षासह तीनजण इतकी असेल.

(चार) विद्यापीठ तक्रार निवारण कक्ष, विद्यार्थ्यांच्या तक्रारीवर निर्णय देताना नैसर्गिक न्यायाच्या तत्वांचे पालन करील.

(पाच) विद्यापीठ तक्रार निवारण कक्ष, तक्रार मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, तक्रारीचे निवारण करील. विद्यापीठ तक्रार निवारण कक्ष, अशा तक्रारींचे प्रमाण कमी करण्याच्या व त्यांना आळा घालण्याच्या उद्देशाने, व्यवस्थापनाला आणि यथास्थिति विद्यापीठाला नियत कालांतराने विविध उपाययोजना सुचवील.

(सहा) विद्यापीठ तक्रार निवारण कक्ष, व्यथित व्यक्तीला (व्यक्तींना) आदेशाची एक प्रत पुरवील.

(५) संस्थात्मक तक्रार निवारण कक्षाच्या किंवा विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाच्या निर्णयाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, सहा दिवसांच्या कालावधीच्या आत लोकपालाकडे अपील दाखल करता येईल.

(६) कक्षाच्या कोणत्याही सदस्याच्या विरूद्ध तक्रार करण्यात आली असेल त्याबाबतीत, तो संबंधित सदस्य, अशा बाबीवरील कार्यवाहीपासून स्वतःला दूर ठेवील.

**६. लोकपाल**.—(१) विद्यापीठ, संस्थात्मक तक्रार निवारण कक्षाच्या किंवा विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाच्या निर्णयाविरुद्धच्या अपिलांवर सुनावणी करण्याकरिता व निर्णय देण्याकरिता एका लोकपालाची नियुक्ती करील.

(२) लोकपाल, विद्यापीठाशी संबंधित नसेल अशी आणि सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश, किंवा सेवानिवृत्त कुलगुरू किंवा सेवानिवृत्त कुलसचिव किंवा सेवानिवृत्त प्राध्यापक किंवा सेवानिवृत्त प्राचार्य यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली व्यक्ती असेल.

(३) लोकपाल हा, लोकपाल म्हणून नियुक्त होण्याच्या वेळी, अशा नियुक्तीपूर्वीच्या एक वर्षामध्ये किंवा लोकपाल म्हणून त्याच्या पदावधीदरम्यान, जेथे त्याचे व्यक्तिगत नाते-संबंध, व्यावसायिक संलग्नता किंवा आर्थिक हितसंबंध यांमुळे त्याला विद्यापीठाबाबतच्या निर्णयशक्तीच्या स्वातंत्र्याशी तडजोड करावी लागेल अथवा तो तडजोड करीत असल्याचे वाजवीरीत्या दिसून येईल अशा बाबतीत, त्याचा विद्यापीठाच्या हितास विरोध असता कामा नये.

(४) लोकपाल, किंवा त्याच्या जवळच्या कुटुंबातील कोणताही सदस्य,–

(एक) विद्यापीठातील लाभाच्या पदाच्या अशा कोणत्याही पदावर किंवा नोकरीमध्ये मागील एका वर्षामध्ये कोणत्याही परिस्थितीत पद धारण करणार नाही किंवा त्याने पद धारण केलेले असणार नाही ;

(दोन) विद्यापीठाशी वैयक्तिक, कौटुंबिक,व्यावसायिक अथवा आर्थिक संबंधासह कोणताही महत्त्वपूर्ण नातेसंबंध ठेवणार नाही ;

(तीन) विद्यापीठाच्या प्रशासन किंवा शासनसंरचनेत, कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारे, विद्यापीठातील कोणतेही पद धारण करणार नाही.

(५) सार्वजनिक विद्यापीठामधील लोकपालाची नियुक्ती, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने, विद्यापीठाच्या कुलगुरुकडून, शोध समितीने शिफारस केलेल्या, पुढील सदस्यांनी मिळून बनलेल्या तीन व्यक्तींच्या नामिकेमधून अंशकालिक तत्त्वावर करण्यात येईल :–

(एक) कुलपतीने नामनिर्देशित केलेला ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ———————अध्यक्ष ;

(दोन) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा सार्वजनिक विद्यापीठाचा कुलगुरू सदस्य ;

(तीन) संबंधित विद्यापीठाचा कुलगुरू———————सदस्य ;

(चार) संबंधित विद्यापीठाचा कुलसचिव———————सचिव.

(६) लोकपाल हा, तो पदावर रूजू झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीकरिता—नियुक्त करण्यात आलेला अंशकालिक अधिकारी असेल आणि त्या विद्यापीठामध्ये आणखी एका मुदतीकरिता त्याची पुनर्नियुक्ती करता येईल. लोकपालाचे पद तीन महिन्यांपेक्षा अधिक

कालावधीकरिता रिक्त राहणार नाही, याची विद्यापीठाकडून सुनिश्चिती करण्यात येईल आणि अशा, पद रिक्त राहण्याच्या कालावधीत, कुलगुरू, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.६) द्वारे नियमन करण्यात येणाऱ्या कोणत्याही विद्यापीठातील विद्यमान लोकपालास तात्पुरता प्रभार नेमून देईल.

(७) लोकपालास, प्रकरणांची सुनावणी घेण्याकरिता, वाहतूक खर्चाच्या प्रतिपूर्ती व्यतिरिक्त, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिल्याप्रमाणे प्रति दिन बैठक फी देण्यात येईल.

(८) लोकपालावरील गैरवर्तनाचे किंवा दुर्व्यवहाराचे किंवा उपरोक्त उपखंड (३) व (४) मध्ये नमूद करण्यात आलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्याबाबतचे आरोप सिद्ध झाल्यास, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने, कुलगुरू त्यास पदावरुन दूर करील.

**(७) लोकपालाचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील:—**

(१) लोकपालास, संस्थात्मक तक्रार निवारण कक्षाच्या किंवा विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाच्या निर्णयांच्या विरुद्ध करण्यात आलेल्या अपिलांची सुनावणी करण्याचा व त्यावर निर्णय देण्याचा अधिकार असेल.

(२) लोकपाल, उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन किंवा पुनर्गुणांकन याबाबतचे कोणतेही अपील विचारार्थ स्वीकारणार नाही. तथापि, परीक्षेतील गैरव्यवहाराचे मुद्दे व मूल्यांकन प्रक्रिया यासंदर्भातील अपिले लोकपालाकडे निर्देशित करता येतील.

(३) लोकपालास कथित भेदभावाच्या तक्रारींची सुनावणी करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीचे, न्यायमित्र म्हणून सहाय्य मागता येईल.

(४) लोकपाल, विद्यार्थ्यांकडून अपील प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या कालावधीच्या आत, तक्रारींचे निवारण करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करील.

**८. लोकपाल आणि तक्रार निवारण कक्ष यांनी तक्रारीचे निवारण करण्याची कार्यपद्धती.—**(१) प्रत्येक विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्याकडे या, अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत, त्यांचे एक संगणकीय (ऑनलाईन) पोर्टल असेल, जेथे त्या विद्यापीठाचा किंवा महाविद्यालयाचा किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेचा कोणताही व्यथित विद्यार्थी, तक्रारीचे निवारण करावे यासाठी अर्ज सादर करू शकेल.

(२) कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यावर, विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था, ती तक्रार संगणकीय पोर्टलवर प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत, त्यांच्या अभिप्रायासह, ती तक्रार समुचित तक्रार निवारण कक्षाकडे किंवा यथास्थिति, लोकपालाकडे विचारार्थ निर्देशित करील.

(३) तक्रार निवारण कक्ष किंवा, यथास्थिति, लोकपाल, तक्रारीवरील सुनावणीचा दिनांक निश्चित करून तो त्या विद्यापीठाला किंवा महाविद्यालयाला किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेला आणि व्यथित व्यक्तीला कळवील.

(४) व्यथित व्यक्ती एकतर स्वतः हजर राहील किंवा तिच्या खटल्यासाठी हजर राहण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे अशा, अन्य व्यक्तीला तिचे प्रतिनिधित्व करता येईल जी विधी व्यावसायिक नसेल.

(५) समुचित तक्रार निवारण कक्षामध्ये किंवा कक्षांमध्ये निवारण न झालेल्या तक्रारी लोकपालाकडे विचारार्थ निर्देशित करण्यात येतील.

(६) विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा मान्याताप्राप्त परिसंस्था, तक्रार निवारणाच्या कामात लोकपालास, किंवा यथास्थिति तक्रार निवारण कक्षाला (कक्षांना) सहकार्य करील आणि तसे करण्यात त्यांनी कसूर केल्यास, लोकपालास किंवा यथास्थिति तक्रार निवारण कक्षाला (कक्षांना) विद्यापीठाच्या कुलगुरुकडे ती बाब कळविता येईल.

(७) कार्यवाही समाप्त झाल्यावर, समुचित तक्रार निवारण कक्ष किंवा, यथास्थिति, लोकपाल, तक्रारीचे निवारण करण्यासाठी योग्य वाटेल असा आदेश, त्याच्या कारणांसह संमत करील आणि वाजवीरीत्या दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व्यथित पक्षकाराला इष्ट असेल असा अनुतोष देईल.

(८) लोकपालाने किंवा, यथास्थिति, समुचित तक्रार निवारण कक्षाच्या अध्यक्षाने स्वाक्षरी केलेला प्रत्येक आदेश, व्यथित व्यक्तीला तसेच विद्यापीठाला किंवा महाविद्यालयाला किंवा यथास्थिति, मान्यताप्राप्त परिसंस्थेला देण्यात येईल, आणि तो, विद्यापीठाच्या किंवा महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या संकेतस्थळावर टाकण्यात येईल.

(९) विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा, यथास्थिति, मान्यताप्राप्त परिसंस्था लोकपालाच्या शिफारशींचे अनुपालन करील. लोकपालाच्या कोणत्याही शिफारशींचे विद्यापीठाने किंवा महाविद्यालयाने किंवा, यथास्थिति, मान्यताप्राप्त परिसंस्थेने अनुपालन न केल्यास, लोकपाल त्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाला कळवील.

(१०) कोणतीही खोटी किंवा क्षुल्लक तक्रार केलेली असल्यास, लोकपालाला तक्रारकर्त्यां विरुद्ध योग्य ती कारवाई करण्याची शिफारस करता येईल.

**९. लोकपाल आणि तक्रार निवारण कक्ष यांबाबतची माहिती.—**यथास्थिति विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था, तक्रार निवारण कक्षाच्या (कक्षांच्या) तरतुदी आणि लोकपाल यांच्या बाबतची सविस्तर माहिती, त्यांच्या संकेतस्थळावर टाकील आणि त्यांच्या माहितीपुस्तिकेत ठळक ठिकाणी छापील.

**१०. अनुपालन न केल्याचा परिणाम.—**विद्यापीठ अनुदान आयोगाला, जे कोणी हेतूपुरस्सर या परिनियमाचे उल्लंघन करील अथवा लोकपालने किंवा यथास्थिति तक्रार निवारण कक्षाने (कक्षांनी) केलेल्या शिफारशीचे पालन करण्यात वारंवार कसूर करील, अशा कोणत्याही विद्यापीठाच्या किंवा महाविद्यालयाच्या किंवा यथास्थिति मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या बाबतीत, पुढीलपैकी एक वा अनेक कारवाया करता येतील :-

(१) विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम (१९५६) (१९५६ चा तीन) कलम १२ ख अन्वये अनुदान प्राप्त करण्यासाठीच्या पात्रतेची घोषणा मागे घेणे.

(२) विद्यापीठास किंवा महाविद्यालयास किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेस यथास्थिति देण्यात येणारे कोणतेही अनुदान रोखून ठेवणे ;

(३) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष सहाय्य कार्यक्रमांतर्गत कोणतेही सहाय्य देण्यासाठी त्यांना विचारात घेण्याकरिता यथास्थिति विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांना अपात्र घोषित करणे ;

(४) यथास्थिति विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था, तक्रार निवारणासाठीचा किमान दर्जा धारण करीत नाही, हे घोषित करणारी नोटीस, यथोचित माध्यमांमध्ये ठळक ठिकाणी प्रसिद्ध करून आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संकेतस्थळावर टाकून, प्रवेशासाठीच्या संभाव्य उमेदवारांसहित सर्वसाधारण जनतेस त्याबाबत कळवणे ;

(५) महाविद्यालयाच्या बाबतीत, महाविद्यालयाची संलग्नता काढून घेण्याची आणि मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या बाबतीत तिची मान्यता काढून घेण्याची संलग्न विद्यापीठाला शिफारस करणे ;

(६) विद्यापीठाच्या बाबतीत, आवश्यक आणि समुचित कारवाई करण्याची संबंधित राज्य शासनाला शिफारस करणे.

(७) अनुपालन न केल्याबाबत कोणत्याही विद्यापीठाच्या किंवा महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या विरुद्ध आवश्यक आणि समुचित कारवाई करणेः

परंतु, विद्यापीठास आपली स्थिती स्पष्ट करण्याची आणि त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आल्याखेरीज या परिनियमाअन्वये विद्यापीठ अनुदान आयोगाकडून कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सिद्धार्थ खरात,**
शासनाचे सहसचिव.

**HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT,**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 25th February 2019.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

No. Parini-2018/CR-125/Vishi-2.—In exercise of the powers conferred by sub-section *(10)*of section 72 read with sub-section *(11)* of section 71 and clause *(b)* of sub-section *(2)* of section 56 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. Act No. VI of 2017), the Government of Maharashtra hereby prescribes the Uniform Statute relating to the functional mechanism of working of the Students' Grievance Redressal Cell, namely:—

**UNIFORM STATUTE No. 5 OF 2019**

**1.** Short Title.—This Statute may be called the Maharashtra Public Universities (Functional Mechanism of Working of Students' Grievance Redressal Cell) Uniform Statute, 2019.

**2.** Definitions.—(1) In this statute unless the context otherwise requires,—

*(i)* "aggrieved student" means a student who has any complaint in the matter concerned with the grievances defined under this statute and includes a person seeking admission to a university or college or recognized institution of higher education ;

*(ii)* "declared admission policy" means such policy for admission to a course or program of study as may be offered by the university or college or recognized institution and published in the prospectus ;

*(iii)* "grievances" include the following complaints of the aggrieved students, namely :—

*(a)* making admission contrary to merit determined in accordance with the declared admission policy of the State and university ;

*(b)* irregularity in the admission process by the university or college or recognized institution;

*(c)* refusing admission in accordance with the declared admission policy as published in prospectus ;

*(d)* non-publication of prospectus either hard copy or online, as specified in para 3 of this Statute ;

*(e)* publishing any information in the prospectus, which is false or misleading, and not based on facts ;

*(f)* withhold or refuse to return any document in the form of certificates of degree, diploma or any other award or other document deposited with the university or college or recognized institution by a person while seeking admission in such university or college or recognized institution, with a view to induce or compel such person to pay any fee or fees in respect of any course or program of study which such person does not intend to pursue ;

*(g)* demand of money in excess of that specified in the declared admission policy or approved by the competent authority to be charged by such university or college or recognized institution ;

*(h)* breach of the policy for reservations in admission as may be applicable ;

*(i)* insisting upon students to submit the original academic and personal certificates and testimonials like mark sheets, school leaving certificate and other such documents at the time of admission, wherever such original documents are not compulsorily required ;

*(j)* complaints of alleged discrimination of students on the grounds of gender, race, caste, class, creed, place of birth, religion and disability;

*(k)* non-payment or delay in payment of scholarships to any student by the university or college or recognized institution after receiving the same from concerned authority;

*(l)* non-adherence of rules of refund of fees in case of cancellation of admission;

*(m)* undue delay in conduct of examinations or declaration of results beyond that specified in the academic calendar ;

*(n)* failure to provide student amenities as may have been promisedor required to be provided by the university or college or recognized institution ;

*(o)* non-transparent or unfair evaluation practices ;

*(iv)* "Department Grievance Redressal Cell (DGRC)" means a Cell constituted under this Statute, at the level of a university department or university institution as prescribed in sub-para (1) of para 5;

*(v)* "Institutional Grievance Redressal Cell (IGRC)" means a Cell constituted under this Statute, at the level of the university as prescribed in sub-para (2) of para 5;

*(vi)* "College Grievance Redressal Cell (CGRC)" means a Cell constituted under this Statute, at the level of a college or recognized institution, as the case may be as prescribed in sub-para (3) of para 5;

*(vii)* "University Grievance Redressal Cell (UGRC)" means a Cell constituted under this Statute, at the level of the university as prescribed in sub-para (4) of para 5;

*(viii)* "office of profit" means an office which is capable of yielding a profit or pecuniary gain, and to which some pay, salary, emolument, remuneration or non—compensatory allowance is attached ;

*(ix)* "Ombudsperson" means the Ombudsperson appointed under this Statute.

*(2)* Words and expressions used but not defined in this Statute shall have the same meanings respectively assigned to them in the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. Act No. VI of 2017).

**3.** Mandatory publication of prospectus, its contents and pricing.—

*(1)* Every university or college or recognized institution shall publish and upload on its website, before expiry of at least sixty days prior to the date of commencement of the admission process to any of its courses or programs of study, a prospectus containing the following for the information of person intending to seek admission to such university or college or recognized institution and the general public, namely:—

*(i)* the list of programs of study and courses offered along with the broad outlines of the syllabus specified by the appropriate statutory authority or by the university, as the case may be, for every course or program of study, including teaching hours, practical sessions and other assignments;

*(ii)* each component of the fee, deposits and other charges payable by the students admitted to such university or college or recognized institution for pursuing a course or program of study, and the other terms and conditions of such payment;

*(iii)* the number of seats approved by the appropriate statutory authority in respect of each course or program of study for the academic year for which admission is proposed to be made;

*(iv)* the conditions of educational qualifications and eligibility including the minimum and maximum age limit of persons for admission as a student to a particular course or program of study, specified by the university or college or recognized institution;

*(v)* the process of selection of eligible candidates applying for such admission, including all relevant information in regard to the details of test or examination for selecting such candidates for admission to each course or program of study and the amount of fee prescribed for the admission test;

*(vi)* rules or regulations for imposition and collection of any fines specified heads or categories, minimum and maximum fine may be imposed.

*(vii)* the percentage of tuition fee and other charges refundable to a student admitted in such university or college or recognized institution in case student withdraws from such university or college or recognized institution before or after completion of course or program of study and the time within and the manner in which such refund shall be made to that student;

*(viii)* documents to be submitted at the time of admission;

*(ix)* details of the teaching faculty, including their educational qualifications, alongwith the category they belong to Regular or Visiting and teaching experience of every member of its teaching faculty;

*(x)* information with regard to physical and academic infrastructure and other facilities including hostel accommodation, library and hospital or industry wherein the practical training to be imparted to the students and in particular the facilities accessible by students on being admitted to the university or college or recognized institution ;

*(xi)* all relevant instructions in regard to maintaining the discipline by students within or outside the campus of the university or college or recognized institution;

*(xii)* clear demarcation of aided and un-aided courses;

*(xiii)* any such information as the university or college or recognized institution may deem fit.

*(2)* The university or college or recognized institution shall publish or upload information referred to in sub-para(1) above, on its official website, and inform prospective students and the general public by giving wide publicity in newspapers and through other media.

*(3)* The university or college or recognized institution shall fix the price of each printed copy of the prospectus including admission form, being not more than the reasonable cost of its publication and distribution, and no profit be made out of the publication, distribution or sale of prospectus.

**4.** Exclusion to Entertain Grievances.—Grievances relating to subject matters governed by any Statutory Mechanism evolved by the State Government for which grievance redressal mechanism has specifically been provided under the relevant State Act, shall not be entertained by the Grievances Redressal Cells or the Ombudsperson.

**5.** Grievance Redressal Cells.—(1) Department Grievance Redressal Cell (DGRC)

*(i)* In case of universities, all complaints relating to university department or university institution shall first be addressed to Department Grievance Redressal Cell (DGRC) to be constituted at the level of university department or university institution, composition of which shall be as follows:—

*(a)* Head of the university department or university institution – Chairperson;

*(b)* A Professor from outside the university department or university institution to be nominated by the Vice-Chancellor- Member ;

*(c)* A faculty member well-versed with grievance redressal mechanism to be nominated by the Head of the university department or university institution – Member-Secretary.

*(ii)* The Chairperson and members of the Cell shall have a term of two years.

*(iii)* The quorum for the meeting shall be two, including Chairperson.

*(iv)* The DGRC shall follow the principles of natural justice while deciding the grievances of the students.

*(v)* The DGRC shall resolve the grievance within period of fifteen days of receiving the complaint and shall submit its report to the head of the department or head of the institution, as the case may be.

*(vi)* The DGRC shall provide a copy of the order to the aggrieved person(s).

*(2)* Institutional Grievance Redressal Cell (IGRC) :

*(i)* The complaints not related to university department or university institution and the grievances not resolved at the DGRC shall be referred to the Institutional Grievance Redressal Cell (IGRC) to be constituted by the Vice-Chancellor of the university, composition of which shall be as follows:—

*(a)* Pro-Vice Chancellor / Dean / Senior professor – Chairperson.

*(b)* two senior professors other than Chairperson - Member

*(c)* one Senate member from the constitutency of registered graduates - Member

*(d)* Director, Students' Development -Member Secretary.

*(ii)* The Chairperson of IGRC and DGRC shall not be the same. The tenure of the Cell members shall be two years.

*(iii)* The quorum for the meetings shall be three, including Chairperson.

*(iv)* The IGRC shall consider the recommendation of DGRC while taking the decision. However, the IGRC shall have the power to review recommendations of the DGRC.

*(v)* The IGRC shall follow the principles of natural justice while deciding the grievances.

*(vi)* The IGRC shall resolve the grievance within period of fifteen days of receiving the complaint. The IGRC shall suggest periodically to the University, different ways and means to minimize and prevent such grievances.

*(vii)* The IGRC shall provide a copy of the order to the aggrieved person(s).

*(3)* College Grievance Redressal Cell (CGRC):

*(i)* In case of colleges or recognized institutions, all complaints shall first be addressed to College or Recognized institution Grievance Redressal Cell (CGRC) composition of which shall be as follows.—

*(a)* Principal of the college or head of the recognized institution-Chairperson;

*(b)* two senior faculty members nominated by the Principal of the College, or head of the recognized institution;

*(ii)* The tenure of the members shall be two years.

*(iii)* The quorum for the meeting shall be two, including Chairperson.

*(iv)* The CGRC shall follow the principles of natural justice while considering the grievances of the students.

*(v)* The CGRC shall resolve the grievance within period of fifteen days of receiving the complaint. The CGRC shall suggest periodically to the Management and University, as the case may be different ways and means to minimize and prevent such grievances.

*(vi)* The CGRC shall provide a copy of the order to the aggrieved person(s).

*(4)* University Grievance Redressal Cell (UGRC):

*(i)* In case of grievance against the university and the grievance not resolved by CGRC, it shall be referred to University Grievance Redressal Cell (UGRC) for which the Vice-Chancellor of the affiliating university shall constitute a University Grievance Redressal Cell (UGRC) consisting

of the six members for an individual college or recognized institution or a group of college or recognized institution keeping in view the location of the college or recognized institution. The UGRC shall be constituted by the Vice-chancellor of the university consisting of:—

*(a)* Pro-Vice Chancellor / Dean / Senior professor – Chairperson;

*(b)* three Principals from amongst the members of the Senate, of whom one shall be a woman and one shall be from Scheduled Castes or Scheduled Tribes or Denotified Tribes or Nomadic Tribes or Other Backward Classes;

*(c)* one member of the Senate from the constituency of registered graduates;

*(d)* Director, Students' Development - Member Secretary.

*(ii)* The Chairperson and members of the Cell shall have a term of two years.

*(iii)* The quorum for the meeting shall be three, including Chairperson.

*(iv)* The UGRC shall follow the principles of natural justice while deciding the grievance of the students.

*(v)* The UGRC shall resolve the grievance within a period of fifteen days of receiving the complaint. The UGRC shall suggest periodically to the Management and University, as the case may be different ways and means to minimize and prevent such grievances.

*(vi)* The UGRC shall provide a copy of the order to the aggrieved person(s).

*(5)* Any person aggrieved by the decision of the Institutional Grievance Redressal Cell or University Grievance Redressal Cell may within a period of six days prefer an appeal to the Ombudsperson.

*(6)* In case the grievance is against any member in the Cell, the concerned member shall abstain himself from the proceeding on such issue.

**6.** *Ombudsperson.-(1)* The university shall appoint an Ombudsperson to hear and decide the appeals against the decisions of the Institutional Grievance Redressal Cell or University Grievance Redressal Cell.

*(2)* The Ombudsperson shall be a person not related to the university and who is a judge not below the rank of retired District Judge or a retired Vice-Chancellor or a retired Registrar or a retired Professor or a retired Principal.

*(3)* The Ombudsperson shall not, at the time of appointment during one year before such appointment or in the course of his tenure as Ombudsperson be in a conflict of interest with the university where his personal relationship, professional affiliation or financial interest may compromise or reasonably appear to compromise, the independence of judgement towards the university.

*(4)* The Ombudsperson, or any member of his immediate family shall not—

*(i)* hold or have held at any point in the past, any post or employment in the office of profit in the university;

*(ii)* have any significant relationship, including personal, family, professional or financial, with the university;

*(iii)* hold any position in university by whatever name called, in the administration or governance structure of the university.

*(5)* The Ombudsperson in the university shall be appointed by the Vice-Chancellor of the university, with the approval of the Management Council of the university, on part-time basis from a panel of three names recommended by the Search Committee consisting of the following members, namely:—

*(i)* Eminent educationist nominated by Chancellor-Chairperson;

*(ii)* Vice-Chancellor of the public university to be nominated by the State Government ... Member;

*(iii)* Vice-Chancellor of the concerned university..... Member;

*(iv)* Registrar of the concerned university.... Secretary.

*(6)* The Ombudsperson shall be a part-time officer appointed for a period of three years, from the date he resumes the office and may be re-appointed for another one term in the same university. It shall be ensured by the university that the office of Ombudsperson shall not remain vacant for a period more than three months and within such period of vacancy, the Vice-Chancellor shall assign temporary charge to the sitting Ombudsperson from any of the universities governed by the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. Act No. VI of 2017).

*(7)* The Ombudsperson shall be paid the sitting fee per day as approved by the Management Council of the University for hearing the cases, in addition to reimbursement of the conveyance.

*(8)* The Ombudsperson may be removed on charges of proven misconduct or misbehaviour or for violation of any of the conditions mentioned in sub-clauses *(3)* and *(4)* above, by the Vice-Chancellor with the approval of the Management Council of the University.

**7.** Powers and Functions of Ombudsperson.—(1) The Ombudsperson shall have power to hear and decide appeals against the decisions of the Institutional Grievance Redressal Cell or University Grievance Redressal Cell.

*(2)* No appeals for revaluation or remarking of answer sheets shall be entertained by the Ombudsperson. However, appeals relating to issues of malpractices in the examination and evaluation processes may be referred to the Ombudsperson.

*(3)* The Ombudsperson may seek an assistance of any person as *amicus curiae*, for hearing complaints of alleged discrimination.

*(4)* The Ombudsperson shall make all efforts to resolve the grievances within a period of 30 days of receiving an appeal from the student.

**8.** Procedure for Redressal of Grievances by Ombudsperson and Grievance Redressal Cell.—*(1)* University or college or recognized institution shall, within a period of three months from the date of issue of this notification, have an online portal where any aggrieved student of that university or college or recognized institution may submit an application seeking grievance redressal.

*(2)* On receipt of any online complaint, the university or college or recognized institution shall refer the complaint to the appropriate Grievance Redressal Cell or the Ombudsperson, as the case may be, along with its comments within 15 days of receipt of complaint on online portal.

*(3)* The Grievance Redressal Cell or the Ombudsperson, as the case may be, shall fix a date for hearing the complaint which shall be communicated to the university or college or recognized institution and the aggrieved person.

*(4)* An aggrieved person may appear either in person or be represented by such person other than legal practitioner, as may be authorized to present his case.

*(5)* The grievances not resolved at the appropriate Grievance Redressal Cell(s) shall be referred to the Ombudsperson.

*(6)* The university or college or recognized institution shall co-operate with the Ombudsperson or the Grievance Redressal Cell(s), as the case may be, in redressal of grievances and failure to do so may be reported by the Ombudsperson or Grievance Redressal Cell(s), as the case may be, to the Vice-Chancellor of the university.

*(7)* On the conclusion of proceedings, appropriate Grievance Redressal Cell or the Ombudsperson, as the case may be, shall pass such order, with reasons for such order, as may be deemed fit to redress the grievance and provide such relief as may be desirable to the affected party at issue, after giving due hearing to both the parties.

*(8)* Every order under the signature of the Ombudsperson or Chairperson of the appropriate Grievance Redressal Cell, as the case may be, shall be provided to the aggrieved person and the university or college or recognized institution, as the case may be, and shall be placed on the website of the university or college or recognized institution.

*(9)* The university or college or recognized institution, as the case may be, shall comply with the recommendations of the Ombudsperson. Any recommendations of the Ombudsperson not complied with by the university or college or recognized institution, as the case may be, shall be reported by the Ombudsperson to the University Grants Commission.

*(10)* In case of any false or frivolous complaint, the Ombudsperson may recommend appropriate action against the complainant.

**9.** Information Regarding Ombudsperson and Grievance Redressal Cell.—The university or college or recognized institution, as the case may be, shall provide detailed information regarding provisions of Grievance Redressal Cell(s) and Ombudsperson on their website and in their prospectus prominently.

**10.** Consequences of Non-Compliance.—The University Grants Commission, in respect of any university or college or recognized institution, as the case may be, which wilfully contravenes this Statute or repeatedly fails to comply with the recommendation of the Ombudsperson or the Grievance Redressal Cell(s), as the case may be, may proceed to take one or more of the following actions, namely:—

*(1)* Withdrawal of declaration of fitness to receive grants under section 12B of the University Grants Commission Act, 1956 (3 of 1956);

*(2)* Withholding any grant allocated to the university or college or recognized institution, as the case may be;

*(3)* Declaring the university or college or recognized institution, as the case may be, ineligible for consideration for any assistance under any of the general or special assistance programmes of the University Grants Commission;

*(4)* Informing the general public, including potential candidates for admission, through a notice displayed prominently in suitable media and posted on the website of the University Grants Commission, declaring that the university or college or recognized institution, as the case may be, does not possess the minimum standards for redressal of grievances;

*(5)* Recommend to the affiliating university for withdrawal of affiliation, in case of a college and withdrawal of recognition in case of recognized institution;

*(6)* Recommend to the concerned State Government for necessary and appropriate action, in case of a university;

*(7)* Take necessary and appropriate actions against any university or college or recognized institution, as the case may be, for non-compliance :

Provided that no action shall be taken by the University Grants Commission unless the university or college or recognized institution, as the case may be, has been given an opportunity to explain its position and an opportunity of being heard has been provided to it.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SIDDHARTH KHARAT,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.